REVIEW OF RESEARCH

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सलंग्न संघटनांचा श्री. गोळवकर गुरूजींनी केलेला विकास

प्रा.दादासाहेब दामोदर हाके

सहाय्यक प्राध्यापक,कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर .

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 8 | MAY - 2019



**प्रस्तावना :**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही भारतातील सर्वात मोठी शिस्तबध्द स्वयंसेवकांची संघटना आहे. आज जवळ जवळ शंभर वर्षे टिकून राहिलेली व आजही विस्तारत असलेली ही एक वैशिष्टयेपूर्ण संघटना आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून कार्यरत असलेल्या फारच थोडया संघटना आपल्या मूळ स्वरूपात फारसा बदल न करता टिकून राहिलेल्या दिसतात. यामध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही संघटना होय. या संघटनेची विशिष्ठ कार्य पध्दती, अत्यंत शिस्तीने एखादे काम घडवून आणण्याची कुवत व मोठा व्याप असलेला दिसून येतो. कारण समाजाच्या समूह जीवनाबद्दल या संघटनांची विशिष्ठ अशी दृष्टी असते व याचा परिणाम समाजावर काही ना काही स्वरूपात होत असतो. जवळ जवळ शंभर वर्षे कार्यरत असलेल्या व लक्षावधी स्वयंसेवक असलेल्या या संघटनेटचा विचार करणे आवश्यक ठरते. प्रस्तुत लेखात डॉ. हेडगेवार यांच्यानंतर दुसरे सरसंघचालक आणि ऋषिरूप सरसंचालक म्हणून श्री. माधव सदाशिव गोळवलकर उर्फ श्री. गुरूजी यांनी आपल्या कालखंडात राष्ट्रीय स्वंयसेवक संघाचा आणि संघ सलग्न संघटनाचा केलेल्या विकासाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

डॉ. हेडगेवारांचा मार्ग कॉंग्रेससारखा जनआंदोलनाचा नव्हता. परंतु त्याचबरोबर क्रांतिकारकांच्यासारखा एकाकी नव्हता. डॉ. हेडगेवार स्वतः क्रांतिकारकांच्या चळवळीत अग्रेसर होते, त्यामुळे त्यांना त्या मार्गाच्या मर्यादा अवगत होत्या. क्रांतिकारकांचे एकाकी हौतात्म्य वाया जाते हे त्यांनी अनुभवले होते. समाजाची व्यापक अनुकूलता, सहानुभूती आणि सक्रिय मदत जोपर्यंत राहणार नाही. तोपर्यंत सामाजिक कार्य व्यर्थ जाईल हे त्यांनी जाणले होते. म्हणून त्यांना अशी एक संघटना हवी होती की, जी स्वातंत्र्याची चळवळ स्वतः चालवील आणि जिला समाजाची सहानुभूती राहील. समुद्रात जसा हिमनग असतो, ज्याचा आठवा भाग पाण्यावर असतो, पण पाण्याखाली असलेल्या सात भागाशी तो जुळलेला असल्यामुळे, त्याला जशी प्रचंड शक्ती प्राप्त होते, तशी संघटना डॉ. हेडगेवारांना हवी होती. संपूर्ण समाज, संघाच्या शाखेवर येईल ही त्यांची कल्पना नव्हती. शहर विभागात शेकडा तीन व खेडे विभागातील शेकडा एक स्वयंसेवक व्हावेत एवढेच लक्ष्य त्यांनी आपल्या समोर ठेवले होते आणि त्यासाठी त्यांनी अपार परिश्रम केले होते. कॉंग्रेसच्या जनआंदोलनाने इंग्रजाविरूध्द जी भावना लोकांमध्ये तयार होत होती, ती आपल्या कार्याला पोषक आहे असे ते मानीत होते. पण तेवढयाने काम भागणार नाही अशी त्यांची धारणा होती. यातूनच डॉ. हेडगेवारांनी १९२५ साली राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली आणि पुढे १९४० पर्यंत त्यांनी संघटनेचा विस्तार केला.[१] संघाचे लष्करासारखे कार्यक्रम, केवळ एका तासाच्या आकस्मिक सूचनेने स्वयंसेवकांनी एकत्र येणे, कार्यक्रमांची प्रसिध्दी टाळणे, जे कार्यक्रम आहेत ते अत्यंत मवाळ स्वरूपात करणे, व्यक्तिगत संपर्क वाढवीत जाणे, तरूणांवरच आपले लक्ष केंन्द्रित करणे, सरकारच्या हेराला संघात प्रवेश मिळणार नाही अशी कार्यपध्दतीची रचना करणे इत्यादी जी संघाच्या कार्यपध्दतीची वैशिष्टये आहेत, ती हिंदूच्या सांस्कृतिक पुनरूत्थानांच्या कार्याशी फारसा जवळचा संबंध ठेवणारी नव्हती. कॉंग्रेसप्रणीत जन-आंदोलनाहून वेगळया तसेच समाजाशी सतत संपर्क साधून असलेल्या अहिंसेशी प्रतिज्ञाबध्द नसलेल्या एकाच वेळी सर्वत्र उठाव करू शकणाऱ्या देशव्यापी चळवळीची ती मजबूत बांधणी होती.

डॉ. हेडगेवारांनी आपल्या मूलगामी सेवाकार्याला पोषक होईल. अशीच आपल्या संघटनेच्या कार्यपध्दतीची रचना अत्यंत सावधपणे व लोकोत्तररीत्या केली. हेडगेवार यांच्या संघकार्याचे एक वैशिष्टये असे आहे की, संघात साध्य व साधन दोन्ही एकरूप झालेली आहेत. सुसंघटित सामजजीवन निर्माण करण्याचे साध्य व दैनंदिन संघटित जीवनाचे संस्कार हे साधन. ज्या स्वयंफलरूपतेमुळे संघ वाढला त्याची कारणे डॉक्टरांच्या व संघकार्याच्या तत्त्वात आढळतात. यामध्ये पहिले तत्व म्हणजे संघ एखाद्या व्यक्तीविषयी किंवा संस्थेविषयी नव्हे, तर संपूर्ण राष्ट्राविषयी

आत्मनिष्ठा निर्माण करण्याचे कार्य करीत आहे. अशी अनन्य राष्ट्रनिष्ठा नसेल तर, केवळ एखाद्या संस्थेच्या बाहयस्वरूपातील श्रध्दा किंवा त्यासंबंधीचा अभिमान राष्ट्राच्या विघटनाचेच आणखी एक कारण ठरेल. म्हणूनच समाजापासून वेगळी अशी संघटना उभारण्याची कल्पना संघाने स्वत:समोर कधीही ठेवली नाही. समाजाच्या एखाद्या विशिष्ठ वर्गाची व भागाची नव्हे, तर संपूर्ण समाजाची घडण करण्याचे लक्ष्य संघाने अगदी सुरूवातीपासून स्वत:समोर ठेवले आहे.

संघाच्या कार्यपध्दतीचे आणखीन एक वैशिष्ठये असे की, त्या कल्पनेचे व पध्दतीचे राजकारणातील स्वरूप वारंवार सांगितले जाते. डॉ. हेडगेवार यांना असे वाटत होते की, राजसत्तेच्या माध्यमामार्फत राष्ट्रजीवनाची उभारणी कदापि होणार नाही. राजकीय सत्ता हे बाहय साधन आहे. प्राचीन परंपरेतील आध्यात्मिक प्रेरणेने उत्स्फुर्त झालेल्या लोकांच्या संघटित जीवनाचे सामर्थ्य हाच खरा राष्ट्रधर्म आहे. तेव्हा राजकीय सत्तेच्या मोहपाशातून दूर, परंतु त्याबरोबर सत्ताधिष्ठीत लोकांच्या चुकांवर नियंत्रण ठेवण्याबाबत दक्ष व समर्थ अशी संघटना उभी करणे, हेच डॉक्टर हेडगेवार यांनी आपले राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबाबतीत आपले ध्येय ठरविले होते. ज्याप्रमाणे सूर्याचा प्रकाश चंद्र परावर्तित करतो त्याप्रमाणे राजसत्ता संघाच्या केंद्रस्त्रोताचा प्रभाव परिवर्तित करेल असे त्यांना वाटले. म्हणून बाहेर कितीही घडामोडी झाल्या, राजकीय प्रलोभनाची वावटळ उठली, तरी जवळच्या वाटा न शोधता राजकारणातील कार्यच संघ करेल, असे त्यांनी ठरविले होते. हि विशिष्ठ कार्यपध्दती घेउन डॉ. हेडगेवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली आणि ती प्रत्यक्षात आचरणात आणली.

## श्री. गुरूजींचा संघाशी परिचय :

हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व हे संघ विचारांचे, संघ तत्वज्ञानाचे आधारभूत सूत्र घेवून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना डॉ. केशव बळीराम हेडेगवार यांनी स्थापना केली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आद्य सरसंघचालक डॉ. हेडगेवार यांच्यानंतर संघ परिवाराचे सारथ करणारे श्री. गोळवलकर गुरूजी विविध गुणांनी सपन्न, अलौकिक व्यक्तिमत्व लाभलेले द्रष्टे महापुरूष होते. प्रभावी व्यक्तिमत्व, उत्कृष्ट संघटन कौशल्य राष्ट्रनिष्ठ महापुरूष, प्रचंड बुध्दीमान आणि मानवाची सेवा ही ईश्वराचीच सेवा करणारा विराट समाज पुरूष अशा विविध गुणांनी सपन्न असे व्यक्तिमत्व श्री. गुरूजींचे होते.

बनारस हिंदू विद्यापीठाचे विद्यार्थी आणि संघ संस्थापक डॉ. हेडगेवार यांचे निकटवर्ती भय्याजी दाणी यांनी १९२८ च्या सुमारास बनारसमध्ये संघाची शाखा सुरू केली. भय्याजी दाणी व काशी हिंदू विश्वविद्यालयातील अन्य स्वयंसेवक यांच्यामुळे प्राध्यापक गोळवलकरांचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी प्रथम संबंध आला. यावेळेस काशी हिंदू विश्वविद्यालयात श्री. गुरूजी तीन वर्षे प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. ते मधूनमधून संघ शाखेत जाऊ लागले. संघाचे स्वयंसेवक व प्राध्यापक गोळवलकर एकमेकांकडे येऊ जाऊ लागले. तात्विक चर्चेच्या पुढे जाऊन प्रत्यक्ष प्रेम व बंधुत्व यांचा व्यवहार सुरू झाला. ते आपलेपणाने स्वयंसेवकांच्या अडचणी दूर करू लागले. अनेकदा ते स्वयंसेवकांना घेऊन पंडित मदनमोहन मालवीयजी यांच्याकडे जात असत. संघाचे कार्य पाहून मालवीयजींनी विद्यापीठाच्या परिसरात संघ शाखेसाठी जागा दिली व लहानशी वास्तूही बांधून दिली.[२]

१९३२ मधील संघाच्या नागपूर येथील विजयादशमीच्या उत्सवाला गुरूजी डॉक्टरजींच्या सांगण्यावरून आले होते. त्यांनतर श्री. गुरूजी डॉक्टरजींच्या बरोबर भंडारा येथेही जाऊन आले. प्रवासात उभयता मध्येसंघ, धर्म, राष्ट्र, संस्कृती, स्वतंत्रत, समाज सुधारणा इत्यादि अनेक विषयांवर विचारविमर्श होऊन संघासंबंधी सर्व माहिती प्रत्यक्ष डॉक्टरजींच्या कडूनच श्री. गुरूजींना मिळाल्यामुळे गुरूजींचे समाधान तर झालेच पण बाहयरूपाने सर्वसामान्य दिसणारे उच्च शिक्षित डॉक्टरजी खरोखरच किती महान आहेत याची जाणीव गुरूजींना झाली आणि डॉक्टरजींच्या विचारांचा गुरूजींच्यावर सखोल प्रभाव पडला. डॉक्टरजींना विद्या व्यासंगी गुरूजींनी आपली सारी गुण संपदा संघ कार्यासाठी वापरून संघकार्य हेच आपले जीवन ध्येय म्हणून अंगिकारावे असे वाटत होते.[३]

१९३३ मध्ये बनारसहून गुरूजी नागपूरला परत आल्यानंतर डॉक्टरजींनी गुरूजींच्यातील अमर्यादित उत्साह व समर्पण वृत्ती पाहून त्यांच्यावर संघ कार्याची अधिक जबाबदारी देऊन, अधिक सक्रिय करण्याच्या हेतूने १९३४ मध्ये नागपूरातील तुळशीबाग संघ शाखेच्या कार्यवाह पदावर नियुक्ती केली. तसेच त्याच वर्षाच्या उन्हाळयामध्ये अकोला येथे झालेल्या संघ शिक्षावर्गाचे सर्वाधिकारी नेमले. गुरूजींनी वर्गातील लहान-मोठया स्वयंसेवकांची नीट काळजी घेतली. आजारी स्वयंसेवकांजवळ बसून ते स्वतः त्याची शुश्रूषा करत असत. त्या वर्गात गुरूजींनी अत्यंत निष्ठापूर्वक, कुशलतेने व स्वत:ला झोकून देऊन वर्गाचे सर्वाधिकारी या नात्याने अतिशय महत्वाची भूमिका निभावली. त्याच सुमारास मुंबईतील संघाच्या शाखेत काम कमी आणि गोंधळ जास्त अशी स्थिती झाली होती. डॉ. हेडगेवारांच्या सागंण्यावरून श्री. गुरूजींनी अकोला जिल्हा संघचालक बाबासाहेब चितळे यांच्याबरोबर मुंबईला गेले. तेथे महिनावर खूप परिश्रम करून गुरूजींनी मुंबईच्या कामाला नवी गती दिली. त्यांनी कार्यकर्त्यांच्या मनातील शंकाकुशंका दूर केल्या. यशस्वी होऊन गुरूजी नागपूरला परत आले.[४]

## संघ कार्य हेच जीवन कार्य :

गुरूजींनी संघ कार्यात अधिक सक्रिय व्हावे अशी डॉक्टरांची इच्छा होती. त्याचप्रमाणे डॉक्टरजींच्या सहवासाचा पण गुरूजींवर परिणाम होऊ लागला होता. संघ कार्याच्या रूपाने समाजातील परमेश्वराचीच सेवा करण्याची संधी आपल्याला मिळत आहे असे गुरूजींना वाटू लागले होते. १९३८ साली नागपूरच्या संघ शिक्षा वर्गात गुरूजींनी सर्वाधिकारी म्हणून उत्तम कामगिरी केली. शारीरिक कार्यक्रम, भोजन

व्यवस्था, रूग्णालय, स्वच्छता आदी सर्व गोष्टींकडे त्यांचे बारीक लक्ष असे. गुरूजींचे वात्सल्य, अनुपम सेवाशीलता, असीम कार्यक्षमता, चित्तवृत्तीची अखंड प्रसन्नता, अमोघ वक्तृत्व, सखोल अध्ययनाची व चिंतनाची बैठक इत्यादी अनेक गुणांचे दर्शन साऱ्या स्वयंसेवकांना या काळात घडले. मुख्य म्हणजे डॉक्टरांचा अखंड सहवास गुरूजींना लाभत गेला. त्यांचे जीवन गुरूजींनी जवळून पाहिले व त्याप्रमाणे आवश्यक ते परिवर्तन आपल्यात करत गेले आणि गुरूजींच्या मधील हे परिवर्तन डॉक्टरांच्या साठी चिंतामुक्त करणारे व सुखावह होते.[५]

१९३९ च्या फेब्रुवारी महिन्यात नागपूर जवळच्या सिंदी या छोटयाशा गावात झालेल्या संघाच्या चिंतन बैठकित डॉ. हेडगेवारजी यांच्या सोबत, बाळासाहेब देवरस, अप्पाजी जोशी, तात्याजी तेलंग, विठ्ठलराव पत्की, बाबाजी सालोडकर, नानासाहेब टालाटुले, कृष्णराव मोहरील इत्यादि जुन्या मंडळी बरोबर श्री. गोळवलकर गुरूजी पण उपस्थित होते. संघाच्या कामात सुसूत्रत, एकसंघता राहावी या दृष्टीने या बैठकीत सखोल, विस्तृत, मनमोकळी सखोल चर्चा होऊन अनेक मूलभूत निर्णय घेण्यात आले. आज प्रचलित असलेल्या संघाच्या संस्कृत प्रार्थनेचा मूळ मराठी आलेख याच बैठकीत गुरूजींनी लिहिला. या संपूर्ण कामकाजात गुरूजींनी मनापासून भाग घेतला. आपल्याला न पटणाऱ्या मुद्यांवर ते अतिशय आवेशपूर्ण व धारदार शब्दात आपले विचार मांडत असत पण एकदा डॉक्टरजींनी आपला निर्णय दिल्यानंतर शांत वृत्तीने मनापासून त्यांच्या निर्णयाचा स्वीकार करत असत. आपली ढासळती प्रकृती लक्षात घेऊन डॉक्टरजींनी संघाची थोडी जबाबदारी गुरूजींच्यावर सोपविण्यास सुरूवात केली. शिंदी बैठकीनंतर डॉक्टरांनी गुरूजींना संघाची शाखा सुरू करण्यासाठी कलकत्ता येथे पाठवले. तेथे त्यांनी एक महिना अखंड भ्रमंती केली. त्यावेळी संघाकडे फारसे पैसे पण नसल्यामुळे ते रोज २० ते २५ मैल पायी फिरत असत. १९३९ च्या वर्षप्रतिपदेला गुरूजींनी कलकत्यात पहिली शाखा सुरू केली. त्यानंतर उन्हाळी वर्गासाठी डॉक्टरजींनी गुरूजींना नागपूरला बोलावून घेतले.[६]

१९३९ मधील नागपूरचा संघशिक्षा वर्ग झाल्यानंतर डॉक्टरजी पुण्याला भगवा झेंडा या चित्रपटाच्या उद्‌घाटनासाठी गेले होते. तो कार्यक्रम आटोपून नागपूरला परत येताना पूर्व नियोजनाप्रमाणे २० जून १९३९ रोजी डॉक्टरजी नाशिक जवळील देवळाली येथे विश्रांतीसाठी गेले. पण तेथेही दुर्दैवाने त्यांना विश्रांती मिळण्याऐवजी पुन्हा न्यूमोनिया झाला. तेथील डॉक्टर व विशेषत: श्री. गोळवलकर गुरूजींनी केलेल्या अथक शुश्रूषेमुळे डॉक्टकरजींच्या प्रकृतीचा निदान त्या वेळचा धोका टळला. श्री. गुरूजींनी त्यावेळी डॉक्टरजींची विचलित न होता सावलीप्रमाणे साथ केली. ७ ऑगस्ट, १९३९ ला गुरूजी डॉक्टरजींना घेऊन नागपूरला परत आले. डॉक्टरजींची महानता समजली आणि त्यामुळेच गुरूजींनी पण आपले उर्वरित जीवन संघ कार्यासाठी सर्मर्पित करण्याचे निश्चित केले.[७]

१३ ऑगस्ट, १९३९ ला गुरूपौर्णिमेच्या दिवशी डॉक्टरजींनी गुरूजींची राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय सरकार्यवाह म्हणून नियुक्ती केली. डॉक्टरांची दोलायमान प्रकृती व कामाचा ताण सहन करण्याची असमर्थता यामुळे सरकार्यवाह श्रीगुरूजी यांनाच सारे काम करावे लागणार हे दिसत होते. श्री. गुरूजी त्यांना दिलेल्या जबाबदाऱ्या अतिशय कार्यक्षमतेने उत्तम प्रकारे पूर्ण करीत आहेत ही गोष्ट डॉक्टरजींना सुखावणारी होती. त्यांच्या मनात भावी सरसंघचालक कोण याचे उत्तर मिळत होते. डॉक्टरांना विध्दान, विरक्त आणि राष्ट्रनिष्ठ असा आपला उत्तराधिकारी सापडला होता आणि गुरूजींना डॉक्टरजींच्या प्रकृतीची काळजी घ्यावी लागत होतीच, पण त्याचबरोबरच अखिल भारतीय स्वरूप घेऊ पाहणाऱ्या संघाच्या वाढत्या व्यापाची जबाबदारीही सांभाळायची होती. १९४० साली पुन्हा गुरूजींना नागपूरच्या संघ शिक्षा वर्गाचे सर्वाधिकारी नेमण्यात आले होते. मे १९४० मध्ये पुणे येथील संघ शिक्षा वर्गात १५ दिवस भाग घेऊन प.पू.डॉक्टरजी नागपूर संघ शिक्षा संघात दिनांक १६ मे ला सहभागी झाले. पण त्याच सुमारास डॉक्टरांची प्रकृती बिघडली. गुरूजी संघ शिक्षा वर्गाची सारी जबाबदारी सांभाळून डॉक्टरांच्या औषधोपचाराकडे व शुश्रूषेकडे काळजीपूर्वक लक्ष देत होते.[८]

१९४० चा संघ शिक्षा वर्ग म्हणजे पू.डॉक्टरांच्या हदयातील साकार झालेले स्वप्न होते. उत्तरेत पंजाब पासून दक्षिणेत चेन्नईपर्यंत विविध प्रांतातून संघाचे स्वयंसेवक पहिल्यांदाच शिक्षा वर्गात एकत्र आले होते. पण पू.डॉक्टरांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे वर्गात जाणे शक्य झाले नव्हते वर्गातील स्वयंसेवकांना भेटताही येत नाही ही अवस्था त्यांच्यासाठी असहय होती. वर्गाच्या किमान समारोपास उपस्थित राहण्याची पू.डॉक्टरांची तीव्र इच्छा होती. परंतु त्यांना तिथपर्यंत जाण्याची परवानगी डॉक्टरांनी दिली नव्हती. अखेर गुरूवार दिनांक २० जून १९४० ला सकाळी तज्ज्ञ डॉक्टर मंडळींनी लंबर पंक्चर करावे लागेल असा सल्ला दिला. त्यांना शेवट दिसत होता. आपला उत्तराधिकरी म्हणून डॉक्टरांनी गुरूजींचे नाव याच वेळी सर्वांना सांगितले. दुसरे दिवशी शुक्रवार दिनांक २१ जून १९४० ला डॉक्टरांची प्राणज्योत मावळली.[९]

## संरसंघचालक गुरूजी आणि तत्कालीन परिस्थिती:

प.पू.डॉक्टरांच्या देहावसानंतर विदर्भातील अकोला येथे पाच संघचालकांची एक बैठक झाली. त्यात प.पू.डॉक्टरजींचे उजवे हात असलेले, वर्ध्याचे श्री.अप्पाजी जोशी, विदर्भाचे श्री.बापूसाहेब सोहनी, नागपूरचे श्री.बाबासाहेब पाध्ये, पश्चिम महाराष्ट्राचे श्री.का.भा. लिमये आणि अकोल्याचे श्री.गोपाळराव चितळे उपस्थित होते. त्यात प.पू. डॉक्टरजींची सांगितल्याप्रमाणे गुरूजींना नूतन सरसंघचालक म्हणून स्वीकारून सर्व ते सहकार्य करण्याचे एकमतोने मान्य करण्यात आले. त्यानुसार ३ जुलै १९४० ला रेशीमबागवरील डॉक्टरांच्या सार्वजनिक श्रध्दांजली सभेत नागपूरचे संघचालक बाबासाहेब पाध्ये यांनी प.पू. डॉक्टरजी यांच्या निर्णयानुसार गुरूजी सरसंघचालकपदाचा कार्यभार पाहतील, ही घाषेणा जन समुदायासमोर केली.[१०]

गुरूजींनी संरसंघचालक पद स्वीकारले त्यावेळी जगात दुसरे महायुध्द सुरू झाले होते. देशातील तत्कालीन ब्रिटीश सरकार अडचणीत होते. त्याच संधीचा लाभ घेऊन ९ ऑगस्ट १९४२ रोजी ब्रिटीशांनो भारत छोडो ही चळवळ तत्कालीन राष्ट्रीय काँग्रेसने केली होती.

पण ही चळवळ सुरू करताना काँग्रेसने देशाच्या स्वातंत्र्यासाठी काम करणाऱ्या अन्य कोणत्याही संघटनांशी विचार विनिमय किंवा त्यांचे सहकार्य घेण्याचा प्रयत्नही केला नाही. त्याचप्रमाणे त्या आंदोलनाचे पूर्ण व्यवस्थित नियोजन पण केले नाही. परिणाम स्वरूप ही चळवळ यशस्वी झाली नाही. ब्रिटीशांनी ती चळवळ पूर्णपणे चिरडून टाकली. त्यावेळी संघाची असलेली मर्यादित ताकद याची जाण गुरूजींना होती. संघ, संघ म्हणून १९४२ च्या आंदोलनात नसला तरी स्वयंसेवकाने व्यक्तिशः आपल्या ताकदी प्रमाणे त्यात सहभाग घ्यावा अशी संघाची इच्छा होती. जिथे जिथे चले जाव आंदोलन छेडले गेले तिथे तिथे संघ स्वयंसेवक होते. आष्टी, चिमूर येथे गोळीबारात मारले गेलेले बहुतेक जण संघ स्वयंसेवकच होते.[११] अनेकजण त्या वेळी तुरूंगात गेले होते. रज्जूभय्या व अटलबिहारी बाजपेयी हे ही त्यावेळी व्यक्तिशः सत्याग्रह करून तुरूंगात गेले होते. अनेक भूमिगत नेत्यांच्या गुप्त निवासाची व सुरक्षेची व्यवस्था जागोजागी संघ स्वयंसेवकांनीच केली होती.

### देशाची फाळणी :

३ जून १९४७ रोजी काँग्रेसच्या नेत्यांनी अचानक फाळणीच्या मान्यतेची घोषणा केली. आधी इंग्रजांनी १ जून १९४८ हा दिवस फाळणीसाठी ठरवला होता. पण त्यांनी अचानकपणे १५ ऑगस्ट १९४७ लाच देश सोडण्याची घोषणा केली. संघाने फाळणीला प्रखर विरोध केला व संपूर्ण देश फाळणीच विरोधात उभा राहावा यासाठी संघाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी संपूर्ण देशभर प्रवास केला. श्रीगुरूजी लाहोर, कराची, अमृतसर, जालंदरच्या प्रवासात जाऊन आले. तिथे हिंदू माणसाचे मनोबल वाढवण्यासाठी व सुरक्षा विषयक उपाय योजनांसंबधी सर्वांशी संवाद साधला. समाजाची सुरक्षा करण्यासाठी युवकांना प्रशिक्षण देण्याचा व्यापक कार्यक्रम हाती घेण्यात आला. या प्रशिक्षणात हल्ले परतवून लावण्याच्या पध्दती, शस्त्रसंचालन याचेही प्रशिक्षण होते.[१२] स्वयंसेवकांनी भेदभाव न करता सर्वांना सुरक्षा दिली.

१४ ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्रीनंतर म्हणजे १५ ऑगस्ट १९४७ ला दिल्लीत झालेल्या समारंभात भारताची सत्ता भारतीय नेत्यांच्या हाती सोपवण्यात आली. फाळणीची घोषणा होताच संघशिक्षावर्ग स्थगित करून श्रीगुरूजींनी स्वयंसेवकांना दंगल पिडीत अशा भागात जाऊन निर्वासित हिंदू बांधवांना मदत करण्याचे आवाहन केले. फाळणीने विस्थापित झालेल्या आपल्या बांधवांना मदत करण्यासाठी जम्मू, दिल्ली, अमृतसार, कोलकाता इ. भागात हिंदू रक्षा समिती, पंजाब रिलीफ कमिटी, वास्तुहारा सहायता समिती इ. नावांनी मदत कार्य सुरू केली होती.[१३]

### काश्मिर विलीनीकरण :

भारताला ऑगस्ट १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यापासून ऑक्टोबर १९४७ पर्यंत जम्मू-काश्मीर संस्थान स्वतंत्र होते. तत्कालीन काश्मीरचे महाराजा हरिसिंग हे त्यावेळी काश्मीर भारतात अथवा पाकिस्तानात विलीन करावे वा स्वतंत्रच ठेवावे यावर कोणताही निर्णय ठामपणे घेण्याच्या मनस्थितीत नव्हते. त्यांची ही द्विधा मनस्थिती ओळखून १८ ऑक्टोबर १९४७ रोजी भारताचे तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या विनंती वरून श्रीगुरूजींनी महाराजा हरिसिंग यांची भेट घेऊन काश्मीर भारतामध्ये विलीन करणे हे काश्मीरी जनतेच्या आणि भारताच्या कसे हिताचे आहे हयावर चर्चा केली व महाराजांचे विचार भारताशी विलीनीकरणाबाबत अनुकूल केले. पण याच दरम्यान पाकिस्तानी सैन्याने टोळीवाल्यांच्या मदतीने २२ ऑक्टोबर १९४७ रोजी जम्मू-काश्मीरवर हल्ला केला. सीमेजवळील मुझफ्फराबाद, उरी, डोमेल आणि बारामुल्ला ही ठिकाणे अक्षरक्षः लुटत आणि जाळत हल्लेखोर वेगाने राजधानी श्रीनगरच्या रोखाने आगेकूच करत होते. अशा परिस्थितीत महाराजा हरिसिंग यांनी तातडीने २६ ऑक्टोबर १९४७ रोजी भारतात सामील करण्याच्या करारावर स्वाक्षरी संस्थानाचे भारतामध्ये विलीनीकरण केले.[१४]

### गांधी हत्या व संघ बंदी :

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर लगेचच १९४८ च्या ३० जानेवारीला संध्याकाळी ५ वाजता महात्मा गांधींची हत्या झाली. या हत्येने असंख्य भारतीयांना धक्का बसला होता. गांधीजींच्या हत्येची बातमी आली तेंव्हा सरसंघचालक गोळवलकर गुरूजी हे चेन्नईमध्ये प्रतिष्ठित नागरीकांबरोबर चर्चेच्या कार्यक्रमात होते. बातमी ऐकताच देशाचे दुर्भाग्य हे दोन शब्द त्यांच्या तोंडातून बाहेर पडले आणि कार्यक्रम रद्द करून ते नागपूरला परतले.[१५] पण चेन्नई सोडण्या आधीच त्यांनी हत्येचा निषेध करणारी तार तत्कालीन पंतप्रधान व गृहमंत्र्यांना पाठवली. नेहरूंना पाठवलेल्या पत्रात ते म्हणतात, या नीच कृत्याचे वर्णन करण्यास माझ्याजवळ शब्दच नाहीत. अशा महापुरूषाला मारणे ही केवळ त्या व्यक्तीशी केलेली कृतघ्नता नसून सगळया देशाची केलेली कृतघ्नता आहे. महात्माजींचे सुपुत्र देवदास गांधी यांनाही तार पाठवून त्यांनी या घटनेचा निषेध करून आपण त्यांच्या शोकात सहभागी असल्याचे सांगितले. त्याच वेळी गांधी हत्येच्या दुखवटया निमित्त संघ शाखा तेरा दिवस बंद राहतील असेही त्यांनी घोषित केले.[१६]

१ फेब्रुवारी, १९४८ च्या उत्तरात्री नागपूर येथे सरसंघचालक माधव सदाशिव गोळवलकर उर्फ श्रीगुरूजी यांना गांधी हत्येच्या कटाबद्दल कमल ३०२ खाली अटक करून त्यांची रवानगी नागपूरच्या कारागृहात करण्यात आली. पण सरकारला यातील फोलपणा लक्षात आल्याने चारच दिवसांत हे कलम मागे घ्यावे लागले. ४ फेब्रुवारी, १९४८ रोजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर बंदी घालण्यात आली आणि वीस हजार स्वयंसेवकांना अटक करण्यात आली. कारागृहात गुरूजींना या बंदीबद्दल माहिती मिळताच त्यांनी ६ फेब्रुवारी रोजी एक वक्तव्य देऊन

आपण संघाचे कार्य स्थगित केले आहे असे जाहीर केले आणि त्याच वक्तव्यात संघावर करण्यात आलेल्या आरोपांचा पण स्पष्ट इन्कार केला.[१७]

यानंतर २६ फेब्रुवारी १९४८ रोजी देशाचे तत्कालीन गृहमंत्री सरदार पटेलांनी गांधी हत्येनंतर अवघ्या २७ दिवसानंतर देशाच्या पंतप्रधानांना लेखी कळवले की गांधीजींच्या हत्येशी संघ किंवा संघ स्वयंसेवकांचा तसूभरही संबंध नाही हे अटक करण्यात आलेल्या आरोपींच्या जबाबावरून आणि तपासावरून लक्षात येते. तसेच १० फेब्रुवारी १९४९ रोजी न्यायाधीश एच.आत्मचरण यांनी खटल्याचा निर्णय देताना त्यात कुठेही संघाचा नामोल्लेखही केला नव्हता. तरीही, ११ जुलै, १९४९ च्या मध्यरात्रीपर्यंत पंतप्रधान नेहरूंनी संघबंदी आणि संघ नेत्यांचा कारावास जुलमीपणे चालूच ठेवला होता.[१८]

तब्बल सहा महिने गुरूजींसारख्या ऋषितुल्य व्यक्तिला विनाकारण तुरूंगात स्थानबध्द करून ठेवल्यानंतर ६ ऑगस्ट, १९४८ रोजी सरकारने गुरूजींना मुक्त केले.[१९] पण गुरूजींना नागपूर सोडण्यास बंदी होती व संघावरील बंदी कायमच होती. संघावर कुठलेही आरोप नसताना बंदी उठवण्याबाबत नेहरू व सरदार पटेलांनी सतत सहा महिने पत्रव्यवहार करूनही सरकारकडून काहीच हालचाल होत नसल्याचे लक्षात येताच सुटकेनंतर संघ कामाला संजीवनी देण्यासाठी गुरूजींनी ताबडतोप देशभव प्रवास आरंभला आणि त्यांना अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. २ नोव्हेंबर, १९४८ रोजी श्रीगुरूजींनी दिल्लीत पत्रपरिषद घेऊन संघाची भूमिका स्पष्ट केली. सरकारने संघावर लादलेले आरोप पूर्णपणे निराधार व असत्य असून एक तर सरकारने ते सिध्द करावेत नाही तर संघावरील बंदी बिनशर्त उठवावी. या आपल्या मागणीचा त्यांना पुनरूच्चार केला. राज्यघटना तयार व्हायची असूनही संघ घटना विरोधी आहे असा केंद्र सरकारचा आरोप होता. या पत्रकार परिषदेनंतर ११ नोव्हेंबर, १९४८ ला गुरूजींना ६ फेब्रुवारी, १९४८ ला दिलेला संघ विसर्जनाचा आदेश आपण मागे घेत आहोत आणि सगळया कार्यकर्त्यांनी पूर्वीच्याच उत्याहाने संघ कार्य सुरू करावे असे जाहीर केले. संघ स्वयंसेवकांना तयांनी सांगितले की, ही लढाई सत्य आणि असत्यातील आहे आणि यात आपला विजय निश्चित आहे. कारण परमेश्वर नेहमी सत्याच्याच बाजूने असतो व त्याची परिणती सरकारने १२ नोव्हेंबर १९४८ रोजी गुरूजींना पुन्हा अटक करून त्यांची रवानगी शिवनी तुरूंगात करण्यात आली.[२०]

गुरूजींना पुन्हा झालेली अटक आणि गांधीजींच्या हत्येचा संघाचा हात नसतानाही संघावरील बंदी उठत नाही हे पाहून, संघाने देशव्यापी सत्याग्रहाचा निर्णय घेतला. गुरूजींनी त्या आशयाचे पत्रक काढले आणि तेव्हाचे सरकार्यवाह भय्याची दाणी यांनी तो निर्णय जाहीर केला. ९ डिसेंबर १९४८ पासून सत्याग्रह सुरू झाला. त्यात सहभागी झाल्याबद्दल ७७०९० स्वयंसेवकांना निरिनिराळया ठिकाणी अटक करून कारावासात पाठवण्यात आले होते. सत्याग्रहाचे स्वरूप अत्यंत साधे व सोपे होते. गावात भगवा ध्वज उभारून संघाची प्रार्थना होत असे. त्यानंतर एका स्वयंसेवकाचे भाषण होई व त्यानंतर घोषणा, गुरूजींना कारागृहातून सोडवा व संघावरील प्रतिबंध उठवा. पंजाब आणि तामिळनाडू प्रातांत सत्याग्रहींवर पोलीसांनी अत्याचार केले. याचे वृत्त वाचल्यावर तामिळनाडूचे माजी ॲडव्होकेट जनरल श्री. टी. आर व्यंकटराम शास्त्री यांनी सरकारच्या निषेधाचे एक पत्र हिंदू दैनिकात प्रसिध्द केले. सत्याग्रहाच्या विशाल अन संयमित स्वरूपामुळे समाजातील विचारी लोक याबद्दल बोलू लागले. बंदी उठवण्याबाबत अनेक विचारवंत, पत्रकार, राजकीय नेते यांच्याकडून सरकारकडे विचारणा सुरू झाली. यातूनच पुण्याच्या केसरी दैनिकाचे तेंव्हाचे संपादक ग.वि.केतकर पुढे आले आणि त्यांनी शिवनी कारागृहात गुरूजींची भेट घेऊन आंदोलन स्थगित करण्याची विनंती केली. तसे झाल्यास चर्चा सुरू होऊ शकेल असे ते म्हणाले. गुरूजींनी ती विनंती मान्य केली. ९ डिसेंबर १९४८ पासून सुरू झालेला सत्याग्रह ४५ दिवस चालून २२ जानेवारी १९४९ ला थांबवण्यात आला.[२१] श्रीगुरूजींच्या कुशल नेतृत्वामुळे आणि स्वयंसेवकांच्या धीरोदात्त व्यवहारामुळे हे सत्याग्रह पर्व असामान्य ठरले व सत्याग्रहाची कीर्ति सर्व दूर पसरली.

७ जून १९४९ ला गुरूजींना शिवनी कारागृहातून २०० किलोमीटर दूर असणाऱ्या प्रांतातील बैतूल कारागृहात हलविण्यात आले, तेथील खाण्या पिण्याची व राहण्याची व्यवस्था अतिशय निकृष्ट दर्जाची होती. कारागृहातील इतर सर्वसामान्य बंदीवानांना मिळत असणाऱ्या किमान सोईनी गुरूजींना मिळत नव्हत्या. याचा परिणाम म्हणजे गुरूजींची प्रकृती खालावत गेली. पण गुरूजींनी या संबंधात सरकारकडे कांहीही तक्रार अथवा विनंती केली नाही. अंतिम विजय सत्याचाच होईल याबाबत त्यांना पूर्ण विश्वास होता.[२२]

संघावरील बंदी उठविण्याच्या बाबतीत, इंग्रजांच्या काळात ॲडव्होकेट जनरल असलेले मद्रासचे श्री. व्यंकटराम शास्त्री यांनी पुढाकार घेतला होता. श्री. शास्त्रीजी तत्कालीन गृहमंत्री व उपपंतप्रधान सरदार वल्लभभाई पटेल यांना भेटले. नंतर गुरूजींनाही भेटले. गुरूजी बैतुलच्या तुरूंगात बंदी होते. त्यांनी गुरूजींना खूप आग्रह केला की, संघाची लिखित घटना नाही, ती तयार करावी, अशी सरकारची इच्छा आहे. गुरूजींनी त्यांना उत्तर दिले की, आमच्याजवळ लिखित घटना नाही, म्हणून आमच्यावर बंदी घातली आहे काय? गांधीजींच्या हत्येचा संघाचा सहभाग आहे, हा आरोप लावून आमच्यावर बंदी घातली आहे काय? हजारो स्वयंसेवकांच्या घरांच्या झडत्या घेण्यात आल्या. हजारोंना तुरूंगात टाकण्यात आले. पण सरकारजवळ कोणताही पुरावा नव्हता. सरकारने बिनशर्त बंदी उठवायला हवी, असे गुरूजींनी स्पष्ट शब्दात सांगितले. पण अखेरीस शास्त्रीजींची वयो ज्येष्ठता बघून संघाची लिखित घटना देण्याचे मान्य केले. या घटनेचा मसुदा तुरूगांच्या बाहेर असलेल्या बाळासाहेब देवरस, एकनाथजी रानडे, दीनदयालजी उपाध्याय यांच्या सारख्या व्यक्तींनी तयार केला व तो गुरूजींकडे पाठविण्यात आला. श्री. गुरूजींनी त्यावर स्वाक्षरी करून तो आलेख ११ जुलै १९४९ ला सरकारकडे पाठविला. अखेर जनमताच्या रेटयापुढे सरकारला झुकावे लागले. १२ जुलै १९४९ रोजी संघावरची बंदी बिनशर्त मागे घेण्यात आल्याची घोषणा आकाशवाणीवरून झाली व गुरूजींची सुटका करण्यात आली.[२३] संघावरील बंदी उठवण्याच्या संदर्भात १४ ऑक्टोबर १९४९ रोजी मुंबई विधानसभेत प्रश्नोत्तरे झाली. त्यात गृहमंत्री मोरारजी देसाई यांनी

संघावरील बंदी बिनशर्त उठविण्यात आली[२४] अशाप्रकारे राष्ट्रीय स्वयंसेवक संघावरची बंदी उठवल्यानंतर गुरूजींनी भारत भर दौरा करून फिनिक्स पक्ष्याप्रमाणे मोठी झेप घेतली व जोमाने संघ कार्यास चालना दिली. खऱ्याअर्थाने श्रीगुरूजींनी सरसंघचालकांचा पदभार स्वीकारल्यानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विस्तार आणि विकास केला. त्यावेळी संपूर्ण भारतात श्रीगुरूजींचे उत्फूर्त सत्कार संमारंभ मोठया प्रमाणात झाले. प्रत्येक सत्कारात श्रीगुरूजींनी स्पष्ट शब्दात सांगितले की, आता घोषणा व जयजयकार पुरे झाले. आता पुन्हा आपल्या शाखा सदृढ केल्या पाहिजेत. शाखांची संख्या वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संघ सलग्न संघटनेचा श्री. गोळवलकर गुरूजींनी केलेला विकास :

संघाच्या विशुध्द आणि प्रेरक राष्ट्र विचारांचे लोण राष्ट्र जीवनाच्या अंगोपांगात पोहोचविल्याशिवाय समर्थ, आत्मविश्वास संपन्न आणि परम वैभव युक्त असा भारत वर्ष उभा व्हावयाचा नाही, या तळमळीने श्रीगुरूजींनी कितीतरी कार्यक्षेत्र प्रेरित केली. कोणत्याही प्रकारची स्वार्थी महत्वाकांक्षा किंवा आसक्ती न बाळगता आपण समाजाची सेवा केली पाहिजे. मानवाची सेवा ही ईश्वराचीच सेवा आहे या आपल्या जीवनाविषयक तत्वज्ञानाचा भाग म्हणून समाज जीवनाच्या अनेक विध क्षेत्रात त्यांनी एक विचाराने काम करणाऱ्या संस्था उभारल्या. राष्ट्र जीवनाच्या विविध अंगांबाबत त्यांनी मूलभूत आणि क्रियाशील मार्गदर्शन केले. यासर्व परिस्थितीच्या पार्श्वभूमिवर गुरूजींनी संघ माध्यमातून अशी घडवलेली, पैलू पाडलेली माणसे एकेका क्षेत्रात पाठवायला, पेरायला सुरूवात केली. त्या माणसांनी स्वत:ला आयुष्यभर गाडून घेतले आणि एक एक संस्था जोमाने उभी राहिली, आज हीच घडलेली माणसे असे सेवा प्रकल्प चालवत आहेत. संघ परिवार हीच आज या सर्व संस्थांची सामूहिक ओळख आहे. गुरूजींच्या प्रेरणेने सुरू झालेल्या परिवारातील संस्थांनी आज विशाल स्वरूप धारण केले. संघ संलग्न संघटनाच पुढील प्रमाणे :

### हिंदू स्वयंसेवक संघ :

ही भारताबाहेरील हिंदू धर्मीयांच्या संघटनासाठी काम करणारी संघटना आहे. या संघाची उद्दिष्टये भारताबाहेरील विखुरलेल्य हिंदू समाजातील लोकांना एकत्र आणणे आणि हिंदू धर्माच्या तत्वांचा व मूल्यांचा प्रसार करणे ही आहेत. १९४७ मध्ये पंजाबचे दोन स्वयंसेवक, जे एकमेकांना परिचित नव्हते. आफ्रिकेतील केनिसा देशात काम धंद्यासाठी एकाच आगबोटीने जात होते. बोटीवरच त्यांची परस्परांशी ओळख झ ाली व त्यांनी बोटीवरच संघाची प्रार्थना म्हटली. त्यांनत केनिया येथे या संघाची पहिली शाखा स्थापन झाली. त्यांनतर इंग्लड व अमेरिकेतही शाखा सुरू झाल्या. या सर्वांची नीट व्यवस्था रहावी म्हणून मा. लक्ष्मणराव भिडे या उत्तर प्रदेशातील ज्येष्ठ प्रचारकारक विश्व विभागाची जबाबदारी सोपवण्यात आली होती आणि या संघटनेचे नावही हिंदू स्वयंसेवक संघ मान्य करण्यात आले.[२५]

### अखिल भारतीय विद्यार्थी परिषद :

ही विद्यार्थ्यांसाठी कार्य करणाऱ्या उद्देशाने तयार करण्यात आलेली एक भारतातील सर्वात मोठी विद्यार्थी संघटना आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेची स्थापना ९ जुलै १९४९ ला मुंबई येथे झाली. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचा उद्देश राष्ट्राचे पुनर्निर्माण आहे. छात्रशक्ती हीच राष्ट्रशक्ती आहे. घोषवाक्य ज्ञान-शील-एकता.[२६]

### भारतीय जनसंघ :

राजकीय क्षेत्रात काम करण्यासाठी राष्ट्रीय विचारांचा एक पक्ष म्हणून २१ ऑक्टोबर १९५१ ला भारतीय जनसंघाची स्थापना झाली. पण १९७५ मध्ये आणीबाणी जारी झाल्यामुळे सामूहिक विचारमंथन होऊन देशाच्या राजकीय परिवर्तनात १९७७ मध्ये जनसंघासह अन्य बिगर जनता पार्टीत भारतीय जनसंघ विलीन करण्यात आला. नंतर त्याचेच रूपांतर आज भारतीय राजकारणाच्या केंद्रस्थानी असलेल्या भारतीय जनता पार्टी या राजकीय पक्षात झाले. [२७]

### वनवासी कल्याण आश्रम :

वनवासी क्षेत्रात काम करण्यासाठी १९५२ साली वनवासी कल्याणाश्रमाची स्थापना झाली. प.पू.गुरूजींच्या प्रेरणेने बाळासाहेब देशपांडेंनी आपले सारे आयुष्य त्यासाठी झोकून दिले. अनेक प्रचारक व कार्यकर्ते यांच्या अखंड परिश्रमामुळे कामाला अखिल भारतीय स्वरूप मिळाले. शिक्षण, स्वयंरोजगार, आरोग्य आणि वनवासींच्या नैसर्गिक गुणवत्तेला वाव देण्यासाठी खेलकूद सारखे हजारो प्रकल्प साडे तीनशे जिल्हयांमध्ये आज राबवले जात आहेत. मोफत शिक्षण देणाऱ्या एक शिक्षकी शाळाच पन्नास हजार आहेत. लिंबाराम व कविता राऊत यांचे यश आपण सर्व पहात आहोच. वनवासी कल्याणाश्रमात घडलेलाच एक वनवासी तरूण मोठा होऊन आज वनवासी कल्याणाश्रमाचा देशव्यापी पसारा शेकडो वनवासी कार्यकर्त्यांच्या मदतीने सांभाळतो आहे ही त्या माणूस घडवण्याच्या कामाची पावती आहे. [२८]

**भारतीय मजदूर संघ :**

याची स्थापना महान विचारवंत श्रध्देय दतोपंत ठेंगडी यांनी स्वातंत्र्य सेनानी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जन्म दिवशी म्हणजे २३ जुलै १९५५ रोजी केली. भारतातील इतर संघटना ज्याप्रमाणे विभाजन होऊन निर्माण झाल्या तशी ही संघटना निर्माण झाली नसून भारतीय मजदूर संघ ही सम विचारधारा असणाऱ्या लोकांच्या एकत्रीकरणाचा प्रयत्न म्हणून झाली. कामगारांचे, मजूरांचे व श्रमदान करणाऱ्यांचे संघटन आहे. आज ही संघटना भारतातील सर्वात मोठी आणि प्रथम क्रमांकाची कामगार संघटना आहे.[२९]

**भारतीय कुष्ठ निवारण संघ :**

छत्तीसगडमध्ये बिलासपूरच्या पुढे चांपा या जिल्हयाच्या ठिकाणी श्रीगुरूजींच्या प्रेरणेने सदाशिव गोविंद कात्रे यांनी भारतीय कुष्ठ निवारण संघ, या नावाची, महारोग्यांची सेवा करणारी संस्था १९६२ मध्ये स्थापन केली. येथे कुष्ठरोग्याची जात, संप्रदाय पुरूष/महिलांचा विचार न करता, सर्वांवर उपचार केला जातो व त्याच बरोबर त्यांच्या शिक्षणाची व पुनर्वसनाची व्यवस्था केली जाते.[३०]

**भारत विकास परिषद :**

स्वामी विवेकानंद यांच्या जन्म शताब्दी वर्षात १० जुलै १९६३ ला संघाने स्वामीजींच्या आदर्शानुसार व शिक्षणानुसार चालणाऱ्या एका गैर सरकारी, सामाजिक, सांस्कृतिक, संस्कारप्रदायी, सेवाभावी, स्वयंसेवीसंस्था म्हणून भारत विकास परिषदेची स्थापना केली. या परिषदेचे ध्येयवाक्य 'स्वस्थ, समर्थ, सुसंस्कृत भारत' हे असून संपर्क -सहयोग-संस्कार-सेवा व समर्पण या पाच सूत्रांच्या व्दारे समाज सेवा करून भारताचा सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, राष्ट्रीय व नैतिक दृष्टया विकास व प्रगती करून समाजात देशभक्ती, एकता व एकात्मता वृध्दिंगत करण्याच्या हेतूने सर्व कार्यक्रमांची आखणी केली जाते. आज परिषदेचे सुमारे एक लाखाहून अधिक सभासद असून मुख्यालय दिल्ली येथे आहे व संपूर्ण भारतभर १२०० हून अधिक शाखा कार्यरत आहेत.[३१]

**विश्व हिंदू परिषद :**

जगातील बहुसंख्य हिंदू भारतात राहत असले, तरीही लाखो हिंदू जगातील इतर देशांमध्येही अभ्यास, व्यापार, व्यवसाय इत्यादि साठी गेले व तेथेच स्थायिक झाले. जगातील संपूर्ण विश्व हिंदू समाजाचा विचार करून या सर्वांना एकत्र आणण्यासाठी एका समान व्यासपीठाची आवश्यकता असल्याचे बऱ्याच हिंदू विचारवंतांचे मत होते. त्याच वेळी भारतातून वेस्ट इंडिजला गेलेल्या लोकांना धार्मिक विधीसाठी इंग्रजी जाणणाऱ्या व्यक्तीची गरज होती, परंतु सेक्युलरवादाचे कारण सांगून तत्कालीन भारत सरकारने त्यासाठी नकार दिला. तेव्हा तेथील पंडित शंभूनाथजींनी श्रीगुरूजींची भेट घेतली. गुरूजींनी विचार केला की विदेशात राहणाऱ्या हिंदूंच्या गरजांची पूर्तता करायला हवी. तसेच आपल्या देशातील अनुसूचित जाती-जमातींच्या बांधवांना संस्कार प्रदान करण्याची गरज आहे तसेच वेगवेगळे पंथ, संप्रदाय, जाती यात विभागलेल्या हिंदू समाजाला एका व्यासपीठावर आणून हिंदू समाजाच्या हित रक्षणाचे काम करण्यासाठी २९ ऑगस्ट १९६४ साली गोकुळ अष्टमीच्या शुभ मुहूर्तावर स्वामी चिन्मयानंदांच्या सांदिपनी आश्रमात विश्व हिंदू परिषदेची स्थापना केली गेली. दादासाहेब आपटे या संघ प्रचारकांना ही जबाबदारी देण्यात आली होती. त्यासाठी श्री गुरूजींनी स्वतः पुढाकार घेतला आणि शंकराचार्य, मध्वाचार्य, रामानुजाचार्य, मास्टर तारासिंग, संत तुकडोजी महाराज आदी सर्व धर्माचार्य व जैन, बौध्द, शीख संप्रदायांच्या प्रमुखांना एकत्रित केले होते.[३२]

सरसंघचालक झाल्यापासून समाज आणि राष्ट्र बांधणीसाठी गुरूजींचा प्रवास सुरू झाला,तो सतत ३३ वर्षे चालू राहिला. याला अपवाद फक्त संघ बंदी आणि देशाचा प्रवास झाला असावा. उन्हाळी संघ शिक्षा वर्गासाठी एप्रिल ते जून असा तीन महिने सलग त्यांचा देशभर प्रवास होत असे. अखंड प्रवासात देशाच्या कानाकोपऱ्यातील स्वयंसेवक, कार्यकर्ते, समाजासाठी काम करणाऱ्या व्यक्ती, संस्था, धार्मिक क्षेत्रातील व्यक्ती व संस्था, राजकीय नेते, कार्यकर्ते अशा हजारो लोकांच्या त्यांच्या भेटी होत. चर्चा होई. देशभरातील घडामोडी, आंदोलने, विचारप्रवाह, भूमिका यांचा थेट परिचय ते करून घेत. या आधारावर अतिशय मूलगामी असे मार्गदर्शन ते करीत असत. व्यक्तीगत भेटी व परिचय यावर त्यांचा विशेष भर असे. केवळ व्याख्यानांनी अथवा चर्चा, वादविवाद यांनी माणसांना कार्यासाठी तयार करता येत नाही. त्यासाठी लागतो हदयस्पर्शी संपर्क, श्री.गुरूजी ज्यांना भेटत त्या सर्वांना स्नेहाच्या शीतल, प्रसन्न व आश्वासक छायेत आल्यासारखे वाटे. याशिवाय अखंडपणे शिबिरे, सभा, चर्चा, लहानमोठे संघ शिक्षा वर्ग, निरनिराळया बैठका इत्यादि मध्ये सहभागी झाल्यामुळे विस्तृत सार्वजनिक संपर्क होत असे. ते सर्वत्र सहकाऱ्यांशी व नागरिकांशी वैयक्तिक नाते स्थापन करीत.

श्रीगुरूजींनी १९४० ते १९७३ या आपल्या ३३ वर्षाच्या सरसंघचालकात्वाच्या प्रदीर्घ कालखंडात त्यांनी हिंदुराष्ट्र स्वसामर्थ्याने व वैभवाने पुन्हा ताठ मानेने उभे करण्याच्या महान आणि अवघड कार्याची धुरा श्री. गुरूजींनी आपल्या खांद्यावर घेवून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ नावाची अभेद्य, सुसंघटित व संपूर्ण देशव्यावी हिंदू संघटना सुविख्यात केली. या दीर्घ कालावधीत संघाने अनेक चढउतार पाहिले तर ही ३३ वर्षे संघाच्या व आपल्या व आपल्या राष्ट्राच्या जीवनातही अत्यंत महत्वाची आणि खळबळजनक होती. अशासर्व परिस्थितीतून श्री. गुरूजींनी आपल्या संघ संलग्न संघनाच्या माध्यमातून संघाचा विकास केला.

**संदर्भ :**


१. पालकर ना. ह., डॉ. हेडगेवार, भारतीय विचार साधना पुणे प्रकाशन, पुणे, पु.१६५.
२. हरी रंगा, गुरूजी गोळवलकर जीवन चरित्र, डोवणे दिपक, प्रकाशक साप्ताहिक विवेक, हिंदुस्थान प्रकाशन संस्था, मुंबई, २०१७ , पृ. ६३.
३. पालकर हरि नारायण, डॉ. हेडगेवार, भारतीय विचार साधना, पुणे, १९९८, पृ. २४५
४. क्षीरसागर भाउराव (अनुवादक), श्री. गुरूजी समग्र खंड २, भारतीय विचार साधना पुणे प्रकाशन, पुणे, २००४, पृ. २००
५. पालकर नारायण हरि, मा.स. गोळवलकर : व्यक्ती व कार्य, प्रकाशक मंगलदास वाणी, मुंबई, १९५६, पृ. ७५.
६. कित्ता.
७. कित्ता., पृ. ७८.
८. हरी रंगा, उपरोक्त, पृ. १०१.
९. पालकर ना. ह., डॉ हेडगेवार, उपरोक्त, ४५६-४६०.
१०. क्षीरसागर भाउराव (अनुवादक), श्री. गुरूजी समग्र खंड १, भारतीय विचार साधना पुणे प्रकाशन, पुणे, २००४, पृ. ३१-३२.
११. तपस्वी मो. ग., राष्ट्राय नम :, प्रभात प्रकाशन, नवी दिल्ली, २००१, पृ. ८३, ८४.
१२. वीरमानी मदनलाला, श्रीगुरूजी पंजाबमे, अचना साहित्य, गोपाल नगर, जालंधर, २००६, पृ. ८,९.
१३. कित्ता, पृ. १०.
१४. कित्ता, पृ.१२ ते १४.
१५. क्षीरसागर भाउराव (अनुवादक), श्री. गुरूजी समग्र खंड १०, भारतीय विचार साधना पुणे प्रकाशन, पुणे, २००४, पृ. १०,११.
१६. कित्ता, पृ. ११.
१७. पालकर नारायण हरि, मा. स. गोळवलकर, उपरोक्त, पृ. ११.
१८. भिमीकर, चं. प.(अनु.), पहिली अग्नि परिक्षा, भारतीय विचार साधना, पुणे, १९९८, पृ. २२.
१९. हरी रंगा, गुरूजी गोळवलकर, प्रकाशक साप्ताहिक विवेक हिदुस्थान प्रकाशन संस्था, मुंबई, २०१७, पृ. १८२.
२०. कित्ता, पृ. १९३.
२१. भिमीकर, चं. प.(अनु.), उपरोक्त, २१८, २२०.
२२. वाजपेयी माणिक चंद, श्री. गुरूजी जीवन प्रसंग खंड १, लोकहित प्रकाशन, संस्कृती भवन, लखनउ, १९८४, पृ. २१८.
२३. Justice on Tril, Orakashan Vibhag- RSS Karnataka, Distributors-Rashtrothana Sahitya, Kempegowda Nagar, Bengalore, २००४
२४. क्षीरसागर भाऊराव (अनुवादक), श्री. गुरूजी समग्र खंड १०, उपरोक्त, पृ. ९०.
२५. इनामदार अशोक, अनासक्त कर्मयोगी पाच सरसंघचालक, भारतीय विचार साधना, पुणे, २०१८, पृ. १२५, १२६.
२६. डोरले प्र.श्री., 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ एक परियच', भारतीय विचार साधना, पुणे प्रकाशन, पुणे, २००३, पृ.४३.
२७. भोळे भा.ल., 'भारतीय गणराज्याचे शासन व राजकारण'
२८. पवार प्रकाश, 'समकालीन राजकीय चळवळी, नवहिंदुत्व व जातसंघटना', डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०११, पृ.१३३.
२९. दत्तुपंत ठेंगडी, 'भारतीय मजदूर संघ', भारतीय श्रमशोध मंडळ, पुणे, २०११, पृ.७.
३०. इनामदार अशोक, उपरोक्त, पृ. १२७
३१. कित्ता
३२. इंदुलकर गंगाधर, 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ : काल, आज आणि उद्या', श्रीविद्या प्रकाशन, पुणे,१९८३,पृ.११६.